N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** रामतीर्थ  **Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0390
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/11/2025 21:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 22/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2025
**Time From (वेळेपासून):** 18:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/11/2025  **Time (वेळ):** 20:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2025 20:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** रामतिर्थ,बिलोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** रामतीर्थ
**District(State) (जिल्हा(राज्य)):** नांदेड(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): साईप्रकाश नरसिंगराव चन्ना

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,नांदेड,रामतीर्थ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,नांदेड,रामतीर्थ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921364600

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दशरथ खंडेराव जांभळीकर | | | 1. पोस्टे ,रामतिर्थ ,रामतीर्थ,नांदेड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमजद पठाण | | | 1. शकरनगर ,बिलोली,रामतीर्थ, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाच हजार रुपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 25/11/2025

मी साईप्रकाश नरसिंगराव चन्ना, वय 41 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9921364600
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महीन्यापासुन पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.

आम्ही दिनांक 22/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार दिलीप शिवराज देशमुख, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती, रा. चिटमोगरा, ता. बिलोली जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.
त्यावरून आम्ही तक्रारदार श्री दिलीप शिवराज देशमुख यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, दिनांक 21/11/2025 रोजी दुपारी 16.00 वाजताच्या दरम्यान मी सोबत माझे मित्र नामे विश्वास लक्ष्मण राचुरे, शिवाजी विश्वाभर जाधव, उध्दव बालाजी ईमडे, व ईतर तीन असे विश्वास राचुरे यांचे शंकरनगर ते बिजूर जानारे रोडवर असलेल्या शेतामध्ये पत्ते खेळत बसलो होतो. अदांजे 17.45 वाजताच्या दरम्याण पोलीस स्टेशन रामतिर्थ येथील बिजुर बिटचे बिट जमादार जांबळीकर व सेवक पांचाळ आले त्यामुळे आम्ही घाबरून पळु लागलो त्या दरम्यान माझे सोबतचे सर्व मित्र पळुन गेले परंतु मला जांबळीकर साहेबानी धरले. आम्ही पत्ते खेळत असलेल्या जागेवर पडलेले पैसे 2200/- रू जांबळीकर साहेबांनी उचलले. त्यानंतर मला दोघांनी मिळुन त्यांच्या खाजगी गाडी मध्ये बसवुन पोलीस स्टेशन रामतिर्थ येथे घेवून गेले. त्याठिकाणी माझे जवळ असलेले 9200/- रू काढून घेतले, मला भिती घालून माझे सोबत असलेले मित्रांची नाव विचारणा केल्याने मी वरील मित्रांची नावे सांगितले. त्यांनतर जांबळीकर साहेबानी माझे मित्रांना फोन करून बोलून घे असे सांगितल्याने मी सर्वाना फोन लावला त्यापैकी विश्वास लक्ष्मण राचुरे हा आला. त्याचे सुद्या खिष्यातील 3200/- रू काढून घेतले. त्यांनतर जांबळीकर साहेबांनी मला व माझे मित्राला प्रत्येकी वीस हजार रूपये दयावे लागते असे म्हणाले तेव्हा मी नायलाजास्तव जांबळीकर साहेबांना प्रत्येकी पाच पाच हजार देण्यास सहमती दिली असता जांबळीकर साहेब प्रत्येकी दहा हजार रू उदया घेवून या तरच मी तुम्हाला सोडेल व तुमची पीसीआर काढणार नाही. असे म्हणुन रात्री साडे दहाच्या दरम्याण आमच्या को-या कागदावर व काही फार्मवर सही घेवून आम्हाला उदया येण्याच्या आटीवर सोडून दिले. मला गुन्हयात अटक करणार नाही, पीसीआर काढणार नाही, घरी पोलीस गाडी घेवून येणार नाही असे म्हणुन जांबळीकर साहेब मागत असलेले दहा हजार रूपये ही लाचेची रक्कम असून ती मला देण्याची मुळीच इच्छा नाही. माझे व जांबळीकर साहेब यांच्यात कोणतीही दुष्मनी नाही. किंवा आमच्यात पैशाचा व्यवहार नाही. जांबळीकर साहेब हे मागत असलेले दहा हजार रूपये ते स्वतः किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली आहे.
तक्रारदाराचे तक्रारीवरून आम्ही पुढील गोपनिय कामाकरीता दोन शासकीय पंच त्या दिवशी उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांनी तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री करून त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार असे सर्वोनुमते लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांनतर आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यांनतर आम्ही खाजगी वाहन स्विफ्ट व्हीडीआय कार क्रमांक एमएच 14 एच 1023 मध्ये चालक पोहेकॉ

मामुलवाड व तक्रारदार यांचे मित्र उध्दव ईमडे यांची सेवन सिटर गाडी क्रमांक एम एच 26 सी.पी 6309 मध्ये सोबत पोलीस निरीक्षक करीम खान पठाण, पोहेकाँ/संतोश वच्चेवार, पोकाँ/जाधव, पोकाँ/ श्याम गोरपले असे सर्व सापळा पथक दोन्ही वाहनानी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडचे कार्यालयातून 16.05 वाजता नांदेड येथून निघून नायगाव तहसील परिसरात सुरक्षित ठिकाणी 17.20 वाजता जावून थांबलो.

लोकसेवक जांबळीकर यांची भेटीचे ठिकाण निश्चित करण्याकरीता लोकसेवक जांबळीकर यांना तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9766425411 यावरून लोकसेवक जांबळीकर यांचा मोबाईल क्रमांक 9518991265 या वर 17.46 वाजता काँल केला असता तक्रारदार यांनी त्यांचे नाव घेवुन नमस्कार साहेब असे बोलून कामा संबधाने बोलले तेव्हा लोकसेवक जांबळीकर हे म्हणाले की, इतका उशीर राहते काय आँफीस टाईम संपले मी सकाळ पासुन तुम्हची वाट बघायलो आहे. तेव्हा तक्रारदार म्हणाले की हो साहेब मी अत्ता आर्धा तासात येतो तुम्हच्या कडे असे सांगितले असता लोकसेवक यांनी फोन कट केला. तेव्हा लोकसेवक जांबळीकर हे पोलीस स्टेशन रामतिर्थ येथे असल्याचे कळाले. त्यानंतर आम्ही पंच क्रं. 1 शेख अहेमद व तक्रारदार देशमुख यांना पोलीस स्टेशन रामतिर्थ येथे पाठवून लोकसेवक यांची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. गावातील अमजद पठाण यांच्या जवळ मला पैसाची मागणी केली होती. त्यामुळे अमजदला काँल करून त्यांना घेवून गेले तर योग्य राहिल असे सांगितले. त्यामुळे आम्ही तक्रारदार यांचे विनंती वरून अमजद यांना काँल करू दिला. त्यांनतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक वरून अमजद यांचा मोबाईल क्र. 7981626127 वर 18.22 वाजता काँल केला असता त्यांनी सांगितले की, मी तुम्हाला सांगितले होते की तीसवर गर्हान मिटवु लालतो मी माझ्यावर घेवु लालतो ऐकला का कोणी माझं आता काहीच नाही तुम्हास भेटायच नसेलतर डायरेक्ट पाच भेटायच काही नाही पाच द्यायच विषय मिटला तुमचं एकट्याच मिटवतो.बाकीच्याच सांगु शकन मी कायबी तेव्हा तक्रारदार म्हणाले तुम्ही याणा आपण जावून जांभळीकर साहेबांना बोलूत तेव्हा अमजद म्हणाले मी बाहेर आहे मी सांगतो फोन करून साहेबांना असे बोलणे झाले. त्यानंतर पडताळणी च्या अनुशंगाने पंच क्रं. 1 व तक्रारदार यांना सुचना दिल्या व त्यानंतर व्हाईस रेकाँर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शेर्टच्या आत दोरीच्या सहयाने गळयात लटकविले. तक्रारदार व पंच क्रमाक 1 यांना लोकसेवकांची भेट घेण्याकरीता लाचमागणी पडताळणी कामी रेकाँर्डर चालु करून 18.50 वाजता रामतिर्थ पोलीस स्टेशन जवळ 100 मिटर अंतरावरून गाडी मधुन उतरून दिले व रवाना केले.

त्यानंतर 19.15 वाजताचे सुमारास तक्रारदार व पंच क्र. 1 हे सपळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी रेकाँर्डर बंद केले त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 श्री शेख अहमद यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली असता तेव्हा दोघांनी सांगीतले की, आम्ही दोघे पोलीस स्टेशन रामतिर्थ येथे गेलोत. त्या ठिकाणी लोकसेवक जांबळीकर हे हजर होते. त्या ठिकाणी गेल्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की सर तुम्ही म्हणल्या प्रमाणे आलो आहे. तेव्हा लोकसेवक यांनी पंच क्र. 1 यांना विचारणा केली की तुम्ही कोण, कुठे राहता, काय करता, कोणत्या डिपाटमेन्ट मध्ये आहेत असे प्रश्न विचारले. तेव्हा त्यांना संशय येत असल्याने पंच क्र. 1 यांनी लोकसेवक यांना व्यवस्थित उत्तर दिले. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना या इकडे...असे म्हणुन बाजुला नेले तुमच काय म्हणन हाय,,,,,, ते दोघ मिळुण 15 द्या मना तेव्हा तक्रारदार म्हणाले ,,,,तर मज म्हणन काय हाय.. मजे 9200/- रुपये मध्ये काहीतरी मज अँडजस्ट करा त्या. 9200/- रूपये होते डावावर तुम्ही घेतले होते ह... तेव्हा तक्रारदार म्हणाले तैचे दोघांचे 5-5 आणून पाच हजार आणून देवून टाकतो. कस सांगा.तेव्हा लोकसेवक म्हणाले त्या दोघाचे मिळुन 15 द्या.. तक्रारदार म्हणाले इमड्याची 5 हजार, त्यांचे 5 हजार 10 पप्पुचे पैसे देलो म्हणालय. ,,,,की...लोकसेवक जाबंळीकर म्हणाले नाही दिले...ते आलत धोतर फिटून गेल त्याच धिंगाना झाला नुसता.. शिवाजीचे 10..शिवाजीचे 10...2 - 2 लाख रुपये फायनांन्स करते डावात त्यान...... बर द्या आता जा.. घेवून या..लवकर. घेवून या की... तक्रारदार म्हणाले 10 मध्ये फायनल लोकसेवक म्हणाले हा... जा.....घेवून ये असे म्हणून तक्रारदार याचेकडे लोकसेवक जांभळीकर यांनी लाचेची मागणी केल्याचे दोघांनी सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

त्यांनतर तक्रारदार यांनी सांगितले की माझा वडीलाची तब्येत ठिक नाही मला फोन आला आहे त्यामुळे मला नांदेड ला जाने अत्यंत आवश्यक आहे. तरी सदरची कार्यवाही उदईक रोजी करण्याची विनंती केली त्यावरून पुढील कार्यवाही उदईक रोजी करण्याचा निर्णय घेवून सर्व सापळा पथक नांदेड ला.प्र.वि कार्यालय येथे आलो.

दिनांक 23/11/2025 रोजी सर्व सापळा पथक व तक्रारदार हे ला.प्र.वि कार्यालय येथून रवाना होवून नायगाव येथे सुरक्षित ठिकाणी थाबुन तक्रारदार यांना काँल करण्याची सुचना केली. तेव्हा तक्रारदार यांनी 16.59 वाजता काँल केला तेव्हा तक्रारदार म्हणाले सर आपण कुठे आहेत, तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना म्हणाले तु फक्त आधार कार्ड पाठव बाकी काही बोलू नको ,,, फक्त आधार कार्ड पाठव ,,,,,असे बोलून फोन कट केला परंतु त्यांचे भेटीचे

ठिकाण निष्चीत झाले नसल्यामुळे सापळा कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे उदईक रोजी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला.

दिनांक 24/11/2025 रोजी सर्व सापळा पथक ला.प्र.वि कार्यालय येथून रवाना होवून बेटमोगरा रोड वर सुरक्षित ठिकाणी जावून थांबले. नमुद ठिकाणी तक्रारदार हे हजर आलेत. त्यावेळी आम्ही, पंच, सापळा पथक व तक्रारदार यांनी सर्वानुमते दिनांक 22/11/2025 रोजी पडताळणी मध्ये लोकसेवक जांभळीकर यांनी 10,000/- रू लाचेची मागणी केली असल्याने आज रोजी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. तक्रारदार यांनी सापळा कार्यवाहीसाठी 5,000/- रुपये त्यांचेजवळ असल्याचे सांगीतल्याने 5,000/- रूपये लोकसेवक जांबळीकर यांना लाच म्हणुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. लाच रक्कम 5,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या खिशात अलगद ठेवून दिले. सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सर्व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर लोकसेवक जांभळीकर यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे गळयात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून 14.04 वाजता तक्रारदार यांचा मित्र उध्दव ईमडे तसेच पंच क्र. 1 श्रीमती पार्वती गावंडे व पोकाँ श्याम गोरपल्ले यांच्या सोबत पोलीस स्टेशन रामतिर्थ येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून पोलीस स्टेशन रामतिर्थ परिसरात गेलोत. त्यानंतर तक्रारदार व त्यांचा मित्र उध्दव असे 14.27 वाजता नियोजीत इशारा न करता परत आले. त्यावेळी पुन्हा सर्व सापळा पथक पुर्वी थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. तेंव्हा तक्रारदार यांच्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की लोकसेवक जांबळीकर हे पोलीस स्टेशन मध्ये हजर होते. त्यांनी मला आधार कार्डची झेरॉक्स आणण्यासाठी पाठविले. त्यांनतर मी आधार कार्डची झेरॉक्स आणुन लोकसेवक जांभळीकर यांना दिली. तेव्हा लोकसेवक जांभळीकर म्हणाले झाले तुझे काम आता इकडे येवू नको, तुझे काम झाले तेव्हा तक्रारदार हे म्हणाले सर आपण म्हणल्या प्रमाणे मी घेवून आलो आहे... तेव्हा लोकसेवक म्हणाले काही बोलू नको तु आता इथ परत यायच नाही जा.... असे बोलून लोकसेवक जांभळीकर यांनी तक्रारदार यांच्या कडून लाचेची रक्कम स्विकारली नाही.

एकंदरीत सापळा कार्यवाही मध्ये लोकसेवक जांभळीकर यांना तक्रारदार यांच्या वर संशय आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. तरी दिनांक 22/11/2025 रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये लोकसेवक जांभळीकर यांनी तक्रारदार दिलीप शिवराज देशमुख व त्यांचे मित्रावर दाखल असलेल्या जुगाराच्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी 10,000/- रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व अमजद पठाण, रा. शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड यांनी लोकसेवक जांभळीकर यांना लाच देण्यास तक्रारदार यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने लोकसेवक 1) दशरथ खंडेराव जांभळीकर, पद सहा. पोलीस उप निरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन रामतिर्थ जि. नांदेड व 2) अमजद पठाण, रा. शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे विरुध्द कलम 7, 7 अ, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
VIKRAM HANMANTU HARALE(I (Inspector)) / POBN79699

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **No.**(क्र.): **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन रामनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VIKRAM HANMANTU
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN79699

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**